## *अधिसुचना*

महसूल व वन विभाग,
मादाम कामा मार्ग
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : -२० जुलै, २०१५

**महाराष्ट्र लोकसेवा हमी अध्यादेश, २०१५**

क्रमांक : एफएसटी-०२/१५/प्र.क्र.८५/फ-४ - महाराष्ट्र लोकसेवा हमी अध्यादेश, २०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५) मधील कलम ३ च्या पोट कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन, याद्वारे महसूल व वन विभाग (वने) मार्फत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर आणि व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादित, नागपूर या कार्यालयांच्या दुय्यम कार्यालयांमार्फत, पात्र व्यक्तींना देण्यात यावयाच्या लोकसेवा आणि यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विर्निदिष्ट केल्याप्रमाणे उक्त अध्यादेशाच्या प्रयोजनार्थ अशा लोकसेवा देण्याकरीता विहित कालमर्यादेसह पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपील प्राधिकारी आणि व्दितीय अंपील प्राधिकारी अधिसूचित करण्यात येत आहे.

## *अनुसुची*

| अ. क्र. | लोकसेवेचा तपशील | आवश्यक दस्ताऐवजांची पुर्तता झाल्यानंतर लोकसेवा पुरविण्यासाठी विहीत केलेली कालमर्यादा (दिवस) | ज्यांच्यामार्फत सेवा पुरविली जाईल, असे पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिल प्राधिकारी | व्दितीय अपिल प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ७ |
| १. | तेंदुपाने कंत्राटदार / उत्पादक यांची नोंदणी करणे. | १० दिवस | उपवनसंरक्षक (प्रादेशिक) | सबंधित मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अकाष्ठ वनोपज सनियंत्रण व मुल्यांकन) |
| २. | बांबू पुरविणेसाठी नवीन बुरड कामगाराची नोंदणी करणे | १५ दिवस | संबंधित उपवनसंरक्षक (प्रादेशिक) | सबंधित मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संसाधन उपयोग) |
| ३. | वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे झालेल्या पशु नुकसानीची नुकसान भरपाई मंजुर करणे. | १५ दिवस | संबंधित वनपरिक्षेत्राचे प्रभारी सहाय्यक वनसंरक्षक (प्रादेशिक/वन्यजीव) | संबंधित उपवनसंरक्षक/ विभागीय वनअधिकारी (प्रादेशिक/वन्यजीव). | सबंधित मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक/वन्यजीव)/व्याघ्र प्रकल्प क्षेत्राचे क्षेत्र संचालक. |
| | | | | वनसंरक्षक (वन्यजीव) | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) |
| | | | वनप्रकल्प विभाग अंतर्गत संबंधित वनपरिक्षेत्राचे प्रभारी सहाय्यक व्यवस्थापक | विभागीय व्यवस्थापक, संबंधित वनप्रकल्प विभाग, महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादीत | महाव्यवस्थापक, संबंधित प्रदेश, महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादीत |

D-21
302